मंगळवार, दि. १७ मार्च २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक १९६ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जीवनदाता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# फसवणुक व दिशाभुलवाली ‘पार्श्वभूमी’

## कोट्यावधींच्या जाहीरातीचा घेतला लाभ, वसुली करा

### जिल्हा माहिती अधिकाऱ्यांच्या आश्वासनानंतर उपोषण मागे; अन्यथा तीव्र आमरण उपोषणाचा ईशारा











**जालना । प्रतिनिधी -** जालना येथून प्रकाशित होणाऱ्या दैनिक पार्श्वभूमी या वृत्तपत्राविरोधात गंभीर आरोप समोर आले असून, १९९६ ते २०२० या कालावधीत आरएनआय प्रमाणपत्राशिवाय हे वृत्तपत्र प्रकाशित करण्यात आल्याची तक्रार मुख्यमंत्री कार्यालयाकडे करण्यात आली आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्याची मागणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सामाजिक कार्यकर्ते दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी आज सोमवार (दि १६) पासून बेमुदत उपोषण सुरु केले होते. दरम्यान, उपचिटणीस जिल्हाधिकारी कार्यालय व जिल्हा माहिती अधिकारी, जालना यांनी दखल घेत योग्य त्या कायदेशीर कारवाईसाठी तात्काळ पाठपुरावा करण्याचे आश्वासन उपोषकर्ते दीपक शेळके यांना दिले. जवळपास १० तासानंतर रात्री उशिरा ८ वाजता आश्वासनानंतर उपोषण मागे घेण्यात आले.

यासंदर्भात अधिक माहिती अशी की, गेल्या दहा वर्षांपासून म्हणजे सन २०१६ पासून जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी, महासंचालक यांना वेळोवेळी दैनिक पार्श्वभुमी संदर्भात निवेदन देऊन कारवाईची मागणी करण्यात येत होती. मात्र, अद्यापही कारवाई होत नसल्याने श्री शेळके यांनी थेट मुख्यमंत्र्यांना निवेदन देत कारवाईची मागणी केली. मुख्यमंत्र्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले होते की, जालना येथून प्रकाशित होत असलेले वृत्तपत्र दैनिक पार्श्वभुमी हे १९९६ पासून विना आरएनआय प्रमाणपत्राशिवाय प्रकाशित करण्यात येत होते. महत्त्वाचे म्हणजे कोणतेही वृत्तपत्र आरएनआय नसतांना शासनमान्य जाहिरात यादीत समाविष्ट केले जाऊ शकत नाही. असे असतांना दैनिक पार्श्वभूमीने शासनाच्या नियमांचे उल्लंघन करून कथितरीत्या खोटी कागदपत्रे सादर केली आणि शासनाची दिशाभूल करून शासन मान्य जाहिरात यादीत स्थान मिळविल. या माध्यमातून शासनाच्या तसेच जिल्हा परिषद, पंचायत समिती, सार्वजनिक बांधकाम विभाग, नगर परिषद लघु पाट बंधारे विभाग, पुनर्वसन आदी विविध शासकीय विभागांकडून मोठ्या प्रमाणात जाहिराती मिळविल्या आहेत. त्यामुळे १९९६ ते २०२० या कालावधीत शासनाच्या कोट्यवधी रुपयांच्या जाहिराती या वृत्तपत्राला देण्यात आल्या असून, हा संपूर्ण व्यवहार नियमबाह्य आहे.

याशिवाय, या वृत्तपत्राच्या छपाईबाबतही गंभीर शंका व्यक्त करण्यात आली आहे. सुमारे २३ हजार प्रती छापल्या जात असल्याचा दावा केला जात असला तरी प्रत्यक्षात तीन हजार प्रतीदेखील छापल्या जात नसल्याची तक्रार करण्यात आली आहे. त्यामुळे संबंधित प्रिंटिंग प्रेसची क्षमता, वीज बिल तसेच प्रत्यक्ष छपाईची नोंद तपासून चौकशी करण्याची मागणी मुख्यमंत्र्यांकडे करण्यात आली होती.

या संदर्भात ता. १६ ऑगस्ट २०१६, १८ ऑक्टोबर २०१७ आणि २७ फेब्रुवारी २०१८ रोजी तसेच ‘आपले सरकार’ पोर्टलवरूनही तक्रारी करण्यात आल्या असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. मात्र, गेल्या अनेक वर्षांपासून या तक्रारींवर कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. तक्रारीची दखल न घेतल्यास १२ जानेवारी २०२६ रोजी आंदोलनाचा ईशारा दिला होत. मात्र, त्यादरम्यान निवडणुका आणि आचार संहिता असल्याने आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले होते. हे उपोषण सोमवार (दि १६) पासून सुरु करण्यात आले होते.

दरम्यान, या प्रकरणाची तातडीने चौकशी करून दोषींवर फसवणूक व शासनाची दिशाभूल केल्याप्रकरणी कारवाई करावी, तसेच संबंधित वृत्तपत्राला शासन मान्य जाहिरात यादीतून वगळावे व जाहिरातींच्या माध्यमातून मिळालेली कोट्यवधींची रक्कम वसूल करावी, अशा मागणीसाठी बेमुदत उपोषणास बसलेले दीपक शेळके यांना जिल्हा माहिती अधिकारी जालना यांनी रात्री ८ वाजेच्या सुमारास पत्र देत योग्य ती कायदेशीर कारवाईसाठी लवकरात लवकर पाठपुरावा वरिष्ठ पातळीवर करण्याचे आश्वासन देऊन ज्यूस पाजून उपोषण थांबविण्यात आले.

उपोषणादरम्यान शहरातील विविध पत्रकारांनी तसेच सामाजिक कार्यकर्ते, राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी दीपक शेळके यांनी भेट घेत उपोषणास पाठींबा दिला. यात प्रामुख्याने आमआदमी पार्टीचे जिल्हाध्यक्ष ए. जी. कांबळे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सामाजिक न्याय विभागाचे सुरेश खंडाळे, विनोद यादव, आर. एस. बोर्डे, नंदु रामरख्या, भरत मानकर, दर्पण सकलेचा, आमेर खान, सुहास वैद्य, साहिल पाटील, सुनील भारती, सिताराम तुपे, पी.एस. भालेराव, संतोष भुतेकर, राजेश भिसे, संतोष जाधव, शेख उमर, ओमप्रकाश शिंदे, शिवाजी शिंदे, सुशीलकुमार वाठोरे, शेख इलियास अब्बास, अशपाक पटेल, बासित बेग, शेख सलीम, सचिन सर्वे, राहुल मुळे, शेख रुस्तम शेख शमशोद्दीन, अजहर शेख मिया, शेख मुजीबुद्दीन, विकास गावंडे, संदीप भाकरे, महेश सारणीकर आदींनी भेट देत उपोषणास पाठींबा दिला.

### उपोषण थांबले; पाठपुरावा सुरुच राहील - दीपक शेळके

उपोषकर्ते दीपक शेळके यांनी आज उपचिटणीस जिल्हाधिकारी जालना व जिल्हा माहिती अधिकारी जालना यांनी केलेल्या विनंतीस मान देऊन बेमुदत उपोषण मागे घेण्यात आले असले तरी पुढे पार्श्वभुमी वृत्तपत्रावर कारवाई करण्यासाठी शासनस्तरावर योग्य तो पाठपुरावा सुरु राहणार असल्याची प्रतिक्रिया उपोषकर्ते दीपक शेळके यांनी दिली. आगामी दोन महिन्यांच्या आत कारवाई न झाल्यास पुन्हा आमरण उपोषणा करण्यात येणार असल्याचे श्री शेळके यांनी यावेळी सांगितले.

## दिव्यांगांच्या उपोषणाकडे मनपा प्रशासनाचे दुर्लक्ष




**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील दिव्यागाचा विविध माग्यासाठी जालना जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सकल दिलेले सामाजिक संघटनेच्या वतीने जिल्हाध्यक्ष राहुल मुळे आमरण उपोषण बसले आहे आज दिनांक १६ मार्च रोजी सकाळी अकरा वाजल्यापासून आमरण उपोषण सुरू झाले असून पहिल्या दिवशी महानगरपालिका प्रशासनाने दुर्लक्ष केले आहे यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सुरेश खंडागळे भरत मानकर यांनी भेट देऊन पाठिंबा दिला आहे दिव्यांगाच्या मागण्या मान्य होईपर्यंत आमरण उपोषण सुरूच ठेवणार असल्याचा इशारा दिव्यांगानी दिलाय दिव्यांगांना गोळ्या झाडल्या तरी मागे हटणार नसल्या तरी इशारा देण्यात आलाय यावेळी सकलदिव्याने सामाजिक संघटनेचे जिल्हाध्यक्ष राहुल मुळे अनिल मगदुले शेख शारुख सविता बोराडे सुरेश बोर्ड सगिता कोरडे रविता गजनन येऊल अकुश वाघचौरे विलास काबळे अनिल महापुरे रवि तायडे शुभम साबने रत्न मामलेकर दत्ता ईगळे सुनिता लोळगे आदिची उपस्थिती होती

## जालना मनपाच्या विशेष सभेत मोठा गोंधळ

### राजदंड तासभर उशिरा; प्रशासनाच्या कारभारावर गंभीर प्रश्न

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहर महानगरपालिकेच्या विशेष सभेत आज अभूतपूर्व गोंधळाचे चित्र पाहायला मिळाले. विशेष म्हणजे ही सभा नेमकी कोणी बोलावली, याबाबतच महापौर, उपमहापौर आणि प्रशासन यांच्यात स्पष्टता नसल्याने मनपाच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

आज झालेल्या या विशेष सभेत एकूण नऊ विषयांवर चर्चा करण्यात आली. पाणीटंचाईचा प्रश्न, शहरातील स्वच्छता व्यवस्था, तसेच विविध नागरी समस्यांवरून सभागृहात जोरदार खडाजंगी झाल्याचे पाहायला मिळाले. सत्ताधारी आणि प्रशासन यांच्यात अनेक विषयांवर आमने-सामनेची स्थिती निर्माण झाली.

मात्र या सभेतील सर्वात धक्कादायक बाब म्हणजे ही विशेष सभा नेमकी कोणी बोलावली, याबाबतच स्पष्ट उत्तर कुणाकडेही नव्हते. याबाबत महापौर आणि उपमहापौरांना विचारले असता त्यांनीही ‘‘ही सभा कोणी बोलावली, याची आम्हाला माहिती नाही’’ अशी प्रतिक्रिया दिली. शहराच्या सर्वोच्च स्थानिक स्वराज्य संस्थेत अशी परिस्थिती निर्माण होणे हे अत्यंत गंभीर मानले जात असून, यामुळे मनपाच्या प्रशासनिक कार्यपद्धतीवर मोठे प्रश्न उपस्थित झाले आहेत.

दरम्यान, सभेच्या कामकाजाच्या सुरुवातीलाच आणखी एक मोठी निष्काळजीपणाची घटना घडली. सभागृहातील राजदंड महापौरांच्या हाती तब्बल एक तास उशिरा देण्यात आला. राजदंडाशिवाय सभेचे औपचारिक कामकाज सुरू होऊ शकत नसतानाही तो वेळेवर उपलब्ध न झाल्याने सभागृहात संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले.

या प्रकारामुळे हा गंभीर निष्काळजीपणा नेमका कोणाचा? संबंधितांवर कारवाई होणार का? असा सवाल उपस्थित होत आहे. विशेषतः महापालिकेसारख्या महत्त्वाच्या संस्थेत प्रोटोकॉल आणि प्रशासनिक शिस्त पाळली जात नसल्याची टीका आता उघडपणे होऊ लागली आहे. सभेदरम्यान पाणीपुरवठा आणि शहरातील स्वच्छतेच्या प्रश्नावर नगरसेवकांनी प्रशासनाला जोरदार धारेवर धरले. शहरातील अनेक भागांत नागरिकांना पाणीटंचाई आणि कचऱ्याच्या समस्येला सामोरे जावे लागत असल्याचे मुद्दे मांडण्यात आले. यामुळे सभागृहात

पान २ वर

### विकासाच्या अजेंडावर सर्वांनी चालावे - दर्शना झोल

**जालना -** जालना शहरात महानगरपालिकेच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विकासकामांना आमचा कोणताही विरोध नाही. मात्र कोणती विकासकामे हाती घेण्यात येणार आहेत, त्या कामांसाठी किती आर्थिक तरतूद करण्यात आली आहे, ती कामे नेमक्या कोणत्या विभागामार्फत केली जाणार आहेत आणि त्या कामांचा प्राधान्यक्रम काय आहे याची सविस्तर माहिती सभागृहात देणे आवश्यक असल्याचे मत नगरसेविका दर्शना झोल यांनी व्यक्त केले.

शहराच्या विकासासाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करणे गरजेचे आहे. जालना शहराचा सर्वांगीण विकास व्हावा हा आमचा मुख्य उद्देश असून विकासाच्या मुद्द्यावर कोणतेही राजकारण होऊ नये, असेही त्यांनी नमूद केले. महानगरपालिकेच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विकासकामांबाबत पारदर्शकता असणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे नागरिकांनाही कामांची माहिती मिळेल आणि कामे नियोजनबद्ध पद्धतीने पूर्ण होतील, असेही त्यांनी सांगितले.

शहराचा विकास साधायचा असेल तर सर्व लोकप्रतिनिधींनी एकत्र येऊन विकासाचा अजेंडा घेऊन पुढे जाणे गरजेचे असल्याचे आवाहनही नगरसेविका दर्शना झोल यांनी केले.



## संपादकीय पान

## बंधने फक्त महिलांवरच का ?

आज २१ व्या शतकात पुरुष आणि महिला असा कोणताच भेद राहिला नाही. आज महिलाही पुरुषांच्या बरोबरीने सर्वच क्षेत्रात अग्रेसर आहेत. असे कोणतेच क्षेत्र नाही जिथे महिला पुरुषांची बरोबरी करू शकत नाही. कला, क्रीडा, राजकारण, समाजकारण, अर्थकारण, विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षण, साहित्य अशा सर्वच क्षेत्रात महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करत आहे मात्र समाजात आजही असा एक घटक आहे ज्यांना महिलांची ही प्रगती खटकत आहे. आजही तो घटक महिलांना केवळ चूल आणि मूल या पुरतच मर्यादित ठेवू इच्छितो म्हणूनच हे सनातनी विचारांचे प्रतिगामी लोक महिलांना सतत या ना त्या कारणांहून ट्रोल करत असतात. कधी ते महिलांच्या केशभूषे वरून ट्रोल करतात तर कधी ते महिलांना त्यांच्या वेशभूषेवरुन ट्रोल करतात. आजच्या मुली मुलांप्रमाणे कपडे घालतात, जीन्स पॅन्ट, टी शर्ट घालतात. त्यांच्या जीन्स पॅन्ट गुडघ्यावर फाटलेल्या असतात याचा त्यांना राग येतो तर कधी मुलींच्या नटण्या मुरडण्याचा त्यांना राग येतो तर कधी त्या व्यायामासाठी सोईस्कर असलेले छोटे कपडे घालून व्यायाम करतात म्हणून त्यांना महिलांचा राग येतो. असाच एक प्रसंग नुकताच घडला. प्रसिद्ध मराठी अभिनेत्री ऐश्वर्या नारकर यांनी त्यांच्या इंस्टाग्राम अकाऊंटवर योगासने करतानाचा व्हिडिओ शेअर केला. या व्हिडिओमध्ये त्यांनी व्यायामासाठी सोईस्कर असलेले छोटे कपडे परिधान केले होते. मात्र एका नेटकऱ्याला ही गोष्ट खटकली आणि त्याने त्यांच्या व्हिडिओवर नकारात्मक कमेंट करत थेट सल्ला दिला, ''कॅमेरा समोर तरी पूर्ण कपडे घालून योगा करत जा.'' अर्थात या कमेंटवर ऐश्वर्या नारकर यांनी त्या ट्रोल करणाऱ्या नेटकऱ्याचा चांगलाच समाचार घेतला. सोशल मीडियावर ऐश्वर्या नारकर यांनी नेटकऱ्याला दिलेले उत्तर चांगलेच चर्चेत आहे. महिलांना ट्रोल करण्यात सर्वसामान्य नागरिकच आघाडीवर आहेत असे नाही तर समाजातील प्रतिष्ठित घटकही मागे नसतात. महिला गुडघ्यावर फाटलेली जीन्स घालतात हे कसले संस्कार असे ? असा प्रश्न मध्यंतरी उत्तरांचलच्या मुख्यमंत्र्यांनी जाहीर सभेत विचारला होता. केवळ हेच महाशय नाही तर अनेकजण महिलांच्या वेशभूषेवरुन महिलांना टार्गेट करत असतात वास्तविक कोणी कोणते कपडे वापरायचे हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे. सार्वजनिक ठिकाणी गुडघ्यावर फाटलेली जीन्स पॅन्ट फक्त महिलाच घालतात का? पुरुषही फाटलेली जीन्स घालतात. बरमुडा किंवा शॉर्ट पॅन्ट घालून गावभर फिरतात पण त्यांच्या कपड्यावर कोणीच आक्षेप घेत नाही. म्हणजे पुरुषांनी कसलेही कपडे वापरले तरी चालेल मात्र महिलांना ते स्वातंत्र्य नाही. महिलांना मात्र त्यांच्या आवडीचे कपडे घालायला बंदी. मग प्रश्न येतो बंधने फक्त महिलांवरच का? महिलांनी कोणते कपडे घालावेत हे ठरवण्याचा अधिकार पुरुषांना कोणी दिला? महिलांनी कोणते व कसे कपडे घालावेत, महिलांनी कोठे फिरावे, काय खावे, काय प्यावे हे पुरुषांनी ठरवावे ही तर अठराव्या शतकातील मानसिकता झाली. २१ व्या शतकातही महिलांना समान अधिकार मिळत नाही त्यांना त्यांच्या अधिकारासाठी झगडावे लागते ही दुर्दैवाची बाब आहे. स्त्री पुरुष समानता ही फक्त बोलण्यापूरतीच आहे हेच या मानसिकतेतून दिसून येते. जगात एकीकडे महिलांना समान अधिकार मिळावेत यासाठी चळवळ उभी केली जात आहे तर आपल्याकडे महिलांनी कसे राहायचे, तिने कोणते कपडे घालायचे, कसे कपडे घालायचे यावर चर्चा केली जाते. प्रश्न महिलांनी कसे आणि कोणते कपडे घालायचा हा नसून प्रश्न त्यांच्या निवडीच्या स्वातंत्र्याचा आणि महिलांच्या मानवी हक्काचा आहे. हे हक्क कोणीही हिरावून घेऊ नये. महिला गुडघ्यावर फाटलेली जीन्स घालतात, तोकडे कपडे घालतात म्हणून त्यांच्यावर लैंगिक अत्याचार होतात असा तर्क लढवला जातो. महिला संध्याकाळी बाहेर फिरायला जातात म्हणून त्यांच्यावर बलात्कार होतात असाही दावा तथाकथित संस्कृती रक्षक करतात पण ते सोयीस्करपणे हे विसरतात की आपल्या देशात अंगभर कपडे घातलेल्या साठ - सत्तर वर्षाच्या वृद्धेवर देखील बलात्कार होतो. विकृत मानसिकता असलेले लोक अंगभर कपडे घातलेल्या महिलांकडे देखील विकृत नजरेने पाहतात. अंगभर कपडे असोत की तोकडे कपडे असोत ज्यांची मानसिकता विकृत आहे त्या नराधमांना महिला केवळ भोगवस्तू वाटते. महिलांच्या कपड्यांवर भाष्य करण्याऐवजी ही पुरुषी मानसिकता बदलली तर देशात महिला अत्याचाराच्या घटना घडणार नाही.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५.**

### पान १ वरुन

### जालना मनपाच्या ...

काही वेळ वातावरण तापलेलेही दिसून आले.

दरम्यान, या संपूर्ण गोंधळावर महापालिका प्रशासनाने अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया दिलेली नाही. त्यामुळे विशेष सभा कोणी बोलावली, राजदंड उशिरा का आला आणि या गोंधळाला जबाबदार नेमके कोण, याबाबत आता राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा रंगली आहे.

जालना महानगरपालिकेच्या इतिहासात अशा प्रकारचा गोंधळ क्वचितच पाहायला मिळाला असून, सभेच्या वैधतेपासून ते प्रशासनाच्या निष्काळजीपणापर्यंत अनेक प्रश्न आता उभे राहिले आहेत. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची चौकशी होणार का आणि जबाबदारांवर कारवाई होणार का, याकडे शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

# होर्मुझः डोनाल्ड ट्रम्पला मित्र देश व नाटोचा, इराण युद्धात मदत करण्यास नकार; यामुळे ट्रम्पची गोची

दिनांक २८ फेब्रुवारीला सुरू झालेले युद्ध आज आगीचा गोळा बनला आहे आणि पश्चिम आशिया-आखातामधील संघर्षाची स्थिती दिवसेंदिवस चिघळत आहे.अमेरिकेने आपल्या ताकतीच्या बळावर व सुपर पॉवरच्या नावावर इराणला नमविन्याचा प्रयत्न केला परंतु अमेरिकेचा डाव फसला.या युध्दात इराणचे सुप्रिमो अयातुल्ला खामेनेई व बलाढ्य टॉप कमांडर सुध्दा मोठ्या प्रमाणात मारल्या गेले.परंतु इराण थोडासाही डगमगला नाही व अमेरिका-इस्त्रायलला जशास तसे उत्तर देऊन आपली रक्षा करण्यास आम्ही सक्षम आहोत ही बाब जगाला दाखवून दिली. आज जगाला अडचणीत आणण्याचे काम डोनाल्ट ट्रम यांनी केले असून जागतिक संपूर्ण अर्थव्यवस्था धोक्यात आणली आहे.डोनाल्ड ट्रम्प आपल्या वर्चस्वासाठी मित्र देश व नाटो देशांना मदत मागित आहे. या व्यतीरिक्त अमेरिकेचे कट्टर दुष्मण देश रशिया व चीन यांना सुध्दा मदत मागण्याची गरज डोनाल्ड ट्रम्पला पडली आहे.यावरून स्पष्ट होते की, डोनाल्ड ट्रम्प यांची पीछेहाट होत असुन ती लपविण्याचा प्रयत्न करीत आहे. जी संघटना अमेरिकेच्या इशाऱ्यावर चालायची त्या ''नाटो''देशांनी या युद्धापासुन दुर रहाण्याचे ठरविले आहे.यावरून स्पष्ट होते की डोनाल्ड ट्रम्प कोणाचाच सहयोगी बनु शकत नाही.कारण तो जगाचा मानवी व आर्थिक हत्यारा आहे ही बाब सुरू असलेल्या युद्धावरून सिद्ध होते. डोनाल्ड ट्रम्पने आपल्या बळाचा वापर करून इराणमधील लाखों आबालवृद्ध, मुलं अशा अनेक निरअपराध्यांचा बळी घेतला यामुळे इराण तिलमिला होने सहाजिकच आहे.त्यामुळे मिडलिस्ट मधील अमेरिकेच्या संपूर्ण सैन्य तळावर हल्ले करून नेस्तनाबूत करण्याचे ठाणले आहे.यात अमेरिकेचे सैन्य मोठ्या प्रमाणात मारल्या जात आहे. परंतु या युद्धाची झळ मध्य पुर्व आशियाई देशांना भोगावी लागत आहे.कारण यात मानवीय व वित्तीय हाणी मोठ्या प्रमाणात झाली आहे आणि होत आहे.त्यामुळे इराणला नमविने तितकेसे सोपे दिसत नाही. आज या महाभयानक युध्दाचा परिणाम जगातील अनेक देशांना भोगावा लागत आहे.कारण ज्या-ज्या ठिकाणी अमेरिकन लष्करी तळ आहे अशा पश्चिम आशियात (मध्य पूर्व) अमेरिकेचे अनेक लष्करी तळ आहेत, ज्यात कतार, बहरीन, कुवेत, सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिराती(युएई), जॉर्डन, ओमान,इराक, दुबई आणि सीरिया या देशांचा समावेश होतो.या देशातील नागरिक भयभीत असुन मोठ्या प्रमाणात मानवी व वित्तीय हाणी झाल्याचे दिसून येते.इराणने अमेरिकेची अनेक क्षेत्रांत नाकाबंदी करने सुरू केले आहे व अमेरिकेला युद्ध थांबविण्यासाठी अटी ठेवल्या आहेत.यामुळे इराण अमेरिकेवर हावी होतांना दिसत आहे. आता इराण- अमेरिका-इजरायल युद्ध होर्मुझवर येवून ठेपले आहे.याकरीता इराणची नाकाबंदी करण्यासाठी आणि तेलकोंडी फोडण्यासाठी होर्मुझच्या जलमार्गाच्या आसपास मित्र देश,नाटो, फ्रान्स, जपान, दक्षिण कोरिया, ब्रिटन,रशिया,चीन यांना इराणवर दबाव टाकण्यासाठी युद्धनौका पाठविण्याची घुटने टेकवुन विनंती डोनाल्ड ट्रम्प यांनी केली आहे.परंतु सर्वांनीच डोनाल्ड ट्रम्प यांची विनंती धुडकावून लावली. त्यामुळे या युद्धात डोनाल्ड ट्रम्प एकटे पडल्याचे दिसून येते. जगातील २२ ते २५ टक्के तेल वाहू जहाज हार्मुझच्या जलमार्गाने जातात आणि दररोज २० ते २१ दशलक्ष बॅरल तेल वाहतूक येथून होत असते.होर्मुझ हे जगातील तेलाच्या वाहतुकीचे सर्वात महत्त्वाचे चोकपॉईंट आहे, कारण या मार्गावर जगभरातील, विशेषतः आशियाई देशांची (भारत, चीन, जपान) ऊर्जा आयात मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहे.त्याचप्रमाणे तेलाव्यतिरिक्त, जागतिक स्तरावरील द्रवीकृत नैसर्गिक वायूची (एलएनजी) मोठी वाहतूक देखील या मार्गाने होते.या मार्गावरील तणावाचा थेट परिणाम जागतिक तेलाच्या किमतींवर होतो. हार्मुझवर नियंत्रण इराणचे असल्याने कोणीही इराणशी वैरत्व स्वीकारण्यास तयार नाही.इराणने तर अमेरिकेला सरळ धमकी दिली आहे की, हार्मुझच्या जलमार्गावर शत्रूची युद्ध नौका दिसली तर तीला उद्ध्वस्त केली जाईल आणि हिंमत असेल तर युद्ध नौका पाठवावी. त्यामुळे इराणचे कितीही जीवित हाणी व वित्तीय हाणी झाली असली तरी आपल्या स्वाभिमानाची लढाई लढण्यास आम्ही सक्षम आहोत ही बाब इराणने अमेरिकेला दाखवून दिली आहे.आज युध्द सुरू होऊन १६ दिवस झाले असले तरी अमेरिका-इस्त्रायलला जशास तसे उत्तर देवून इराणने आघाडी घेतली आहे. डोनाल्ड ट्रम्पच्या चुकीच्या निर्णयामुळे जगाची दैन्यावस्था झाली असून सर्वांवर तेल व आर्थिक संकट ओढावले असून पश्चिम आशियातील परिस्थिती अत्यंत चिंताजनक स्थितीत येवून पोहोचली आहे.अमेरिकेला १६ दिवसांच्या काळात हजारो बिलियन डॉलरचे नुकसान झाले आहे. परंतु झालेले नुकसान लपवित आहे.रशियन तेलाची आयात भारताने थांबवावी यासाठी भारतावर दडपण आणणारा डोनाल्ड ट्रम्प आता युद्धजन्य परिस्थिती रशियापुढे घुटने टेकले आहेत आणि डोनाल्ड ट्रम्प भारतासह जगाला सांगतो की,रशिया कडून तेल आयात करा अशा पध्दतीची विनवणी व भिक ट्रम्प मागत आहे.इराणची सुरक्षा यंत्रणा आयारजीसीने संपूर्ण कमांड आपल्या हातात घेतल्याने अमेरिका घायाळ होत असल्याचे दिसून येते.कारण युध्दाची सुरूवात अमेरिकेने आणि युद्ध त्यालाच थांबवावे लागेल.डोनाल्ड ट्रम्प हा सध्याच्या परिस्थितीत जगाचा हत्यारा आहे.डोनाल्ड ट्रम्प सत्तेत आले तेव्हा त्यांनी अमेरिकेसह जगातील अनेक देशांसाठी मोठ्या अडचणी निर्माण केल्या आहेत प्रथम टेरिफ वॉर आणि आता तिसऱ्या महायुद्धाचा भडका हा अत्यंत गंभीर व चिंताजनक विषय आहे यासाठी डोनाल्ड ट्रम्प यांनी एक पाऊल मागे हटुन अमेरिका- इराण- इस्त्रायल युद्ध थांबविले पाहिजे अन्यथा याचे गंभीर परिणाम अमेरिकेलाच भोगावे लागतील.डोनाल्ड ट्रम यांच्या चुकीच्या निर्णयामुळे अमेरिकेत त्यांची राजकीय कोंडी होतांना दिसत आहे.सैनिकांचा मृत्यू, तेल दरवाढ व बाजारातील घसरणीमुळे अमेरिकन जनतेकडुन तीव्र टीका होत आहे.कारण सध्या सुरू असलेल्या युद्धाचा सुत्रधार फक्त डोनाल्ड ट्रम्पच आहे.त्यांच्या चुकीच्या निर्णयामुळे इराणसह पश्चिम आशियातील(मिडलिस्ट) देशांची हजारोंच्या संख्येने मानवीय हाणी व मोठ्या प्रमाणात वित्तीय हाणी झाली आहे.अमेरिका खरोखरच स्वतःला सुपर पॉवर आणि लोकशाहीचा देश समजत असेल तर त्याने संवादाच्या माध्यमातून ताबडतोब युद्ध थांबवावेत.वर्चस्वाच्या लढाईत युध्द कुणीही जिंको,मरतो सर्वसामान्य माणूस, पशुपक्षी,जीवजंतू यात ना हार,ना जीत; युद्ध केवळ मृत्यू व गंभीर जखमा देतो आणि या जखमा अनेक काळापर्यंत हृदयात घर करून बसतात ही गोष्ट पिसाळलेल्या ट्रम्पला समजायला हवी.जय हिंद.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# क्रीडा ई- प्रमाण खेळाडूच्या पाच टक्के आरक्षणासाठी प्रणालीवर नोंदणी करून घरबसल्या प्रमाणपत्र मिळवा

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र राज्यातील गुणवंत खेळाडूंना शासकीय आणि निमशासकीय सेवांमध्ये ५% आरक्षणाचा लाभ अधिक सुलभ पारदर्शक आणि जलद गतीने मिळावा यासाठी क्रीडा व युवक सेवा संचालयाने क्रीडा प्रमाण ही ब्लॉकचेन तंत्रज्ञानावर आधारित अद्यावत प्रणाली कार्यान्वित केली आहे. प्रणालीचे वैशिष्ट्य आणि महत्व ✻ब्लॉकचेन तंत्रज्ञान: ही प्रणाली ब्लॉगचेन () आणि कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित असल्याने या मध्ये कोणत्याही प्रकारचा मानवी हस्तक्षेप किंवा फेरफार करणे शक्य नाही ज्यामुळे बोगस प्रमाणपत्रांना पूर्णपणे आळा बसेल. ✻त्वरित पडताळणी: खेळाडूंनी माहिती भरल्यानंतर आणि मूळ डेटांशी ती जुळल्यास अवघ्या २४ तासाच्या आत डिजिटल पडताळणी अहवाल होतो. ✻क्यू आर कोड सुरक्षा: प्रत्येक प्रमाणपत्रावर एक अद्वितीय किंवा कोड असेल जो स्कॅन करून संबंधित नियुक्त प्राधिकरण (उदा. पोलीस भरती) प्रमाणपत्राची सत्यता त्वरित पाठवू शकते . आगामी पदभरतीसाठी क्रीडा एक प्रमाणपत्र बंधनकारक महाराष्ट्र लोकसेवा आयोग () तसेच सर्व शासकीय पद भरतीसाठी अर्ज करताना खेळाडूंना आता या क्रीडा ही प्रमाणपत्राची प्रत जोडणे अनिवार्य करण्यात आले आहे या प्रमाणपत्राशिवाय खेळाडूंनी संवर्गातून

अर्ज विचार केला जाणार नाही याची सर्व खेळाडूंनी नोंद घ्यावी. ज्या खेळाडूंनी यापूर्वी विभागीय उपसंचालक क्रीडा व युवक सेवा यांच्याकडून प्रमाणपत्राची पडताळणी केली आहे त्यांनी यापुढे शासकीय व शासकीय भरतीसाठी अर्ज सादर करायचा असल्यास या प्रणाली द्वारे प्रमाणपत्र तयार करून घेणे आवश्यक आहे. प्रमाणपत्रासाठी अर्ज करण्याची पद्धत या प्रणाली अंतर्गत ५% खेळाडू आरक्षणाचे संघटनेमार्फत प्राप्त अभिलेख क्रीडा इ प्रमाण पोर्टलवर यशस्वीरित्या अपलोड करण्यात येत आहे या अभिलेखाद्वारे खेळाडू आपले पाच टक्के खेळाडू प्रमाणपत्र प्राप्त करून घेऊ शकतात यासाठी आवश्यक असणारा तपशील पुढील प्रमाणे.

खेळाडूंना पोर्टलवर नोंदणी करणे अनिवार्य ज्या खेळाडूंनी अधिकृत स्पर्धेमध्ये प्राविण्य मिळवले आहे अशा सर्व खेळाडूंनी क्रीडा विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर ला ://.../भेट द्यावी. केतस्थळावर सर्वात खाली आमच्या सेवा ( ) मध्ये ५% या टॅब मध्ये जाऊन आपली एक वेळ नोंदणी पूर्ण करावी या नोंदणी करता वैयक्तिक माहिती व क्रीडा प्रमाण पोर्टलवर अर्ज या सर्व बाबीसाठी खालील माहिती खेळाडूंनी तयार ठेवावी. १. नोंदणीसाठी खेळाडूंनी आपल्या आधार संलग्न मोबाईल क्रमांक आणि आय कार्डचा वापर करणे आवश्यक आहे. २. स्वतःचा योग्य व दैनिक वापर ई-मेल आयडी ३. आधार कार्ड पीडीएफ ४. क्रीडा स्पर्धे त प्राप्त प्राविण्य प्रमाणपत्र ज्या खेळाचे अभिलेख प्रणालीवर उपलब्ध आहे त्यांनी तात्काळ या प्रणालीचा लाभ घेऊन आपले डिजिटल प्रमाणपत्र घरबसल्या प्राप्त करून घ्यावे. स्पर्धे त अभिलेख उपलब्ध नसल्यास द्वारे अर्ज करावा ज्या खेळाडूंनी माहिती अभिलेख खात किंवा प्रमाणपत्र तांत्रिक कारणास्तव प्रणालीवर दिसत नसतील ,तर . या ईमेलवर आपली तक्रार आपल्याकडे असलेल्या क्रीडा प्रमाणपत्रासह नोंदवा. खेळाडूंनी आपले निवेदन सादर करताना खालील बाबी ची पूर्तता करावी.

आपण सहभागी झालेल्या स्पर्धे चे अचूक नाव व वर्ष नमूद करावे. आपल्याकडे उपलब्ध असलेल्या मूळ क्रीडा प्रमाणपत्रा ची स्कॅन केलेली प्रत निवेदनासोबत जोडावी असे अर्ज प्राप्त झाल्यानंतर विभाग स्तरावरच्या त्या माहितीची शहानिशा करून सदर अभिलेख पोर्टलवर अद्यावत करण्याची कारवाई केली जाईल. अधिक माहितीसाठी आणि मार्गदर्शनात सूचनांसाठी खेळाडूंनी या संकेतस्थळावर भेट द्यावी.

तसेच अन्य खेळाच्या अभिलेख प्रणालीवर उपलब्ध करून दिल्यानंतर त्याबाबत माहिती त्वरित याद्वारे संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल. महत्वाची सूचनाः- कबड्डी फेन्सिंग ट्रायलॉन २०२५ ची स्पर्धा जुडो २०२४ ची स्पर्धा कोराश २०२४ २५ व २०१७ १८ या स्पर्धेचे अभिलेख ऑनलाईन उपलब्ध आहेत त्याच खेळाडूंना प्रमाणपत्रासाठी अर्ज करावेत इतर पात्र खेळांच्या खेळाडूंनी नोंदणी करावी इतर अभिलेख देखील अपलोड करण्याची कारवाई सुरू आहे. असे जिल्हा क्रीडा अधिकारी, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# जनगणना २०२७ विषयक तीन दिवसीय प्रशिक्षणास आजपासून सुरुवात

**जालन । प्रतिनिधी -** आगामी जनगणना २०२७ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक पूर्वतयारीच्या अनुषंगाने येथील जिल्हाधिकारी कार्यालयातील महसुल सभागृहात तीन दिवसीय प्रशिक्षणास अपर जिल्हाधिकारी तथा प्रभारी जिल्हाधिकारी रमेश मिसाळ यांच्या हस्ते आज सुरुवात झाली.

यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, तहसिलदार छाया पवार यांच्यासह जनगणना संचालनालयाचे सहाय्यक संचालक अजय ठाकुर आणि विशाल दिवेकर हे मुख्य प्रशिक्षक म्हणून उपस्थित होते. यावेळी प्रभारी जिल्हाधिकारी रमेश मिसाळ मार्गदर्शन करतांना म्हणाले की, जनगणना कार्य संचालनालय, महाराष्ट्र यांच्या वतीने जनगणना-२०२७ संदर्भातील कार्यवाही सुरू झाली असून, ही जनगणना दोन टप्प्या मध्ये होणार आहे. पहिल्या टप्प्यात घरांची यादी आणि घरांची गणना करण्यात येणार असून, दुसऱ्या टप्प्यात प्रत्यक्ष लोकसंख्येची गणना करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने जालना जिल्ह्यातील चार्ज अधिकारी, अतिरिक्त चार्ज अधिकारी तसेच जनगणनेशी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी पहिल्या टप्प्यातील घरांची यादी तयार करणे, लोकसंख्या गणना आदी विषयावर तीन दिवसीय प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे.

सर्व प्रशिक्षणार्थींनी या तीन दिवसीय जनगणना प्रशिक्षणाच्या माध्यमातून डिजिटल जनगणनेबाबत असेलेल्या

आपल्या समस्या तसेच प्रश्नांचे निराकरण करुन घ्यावे, असे सांगितले. निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल यांनी प्रास्ताविकात प्रशिक्षण आयोजनामागील उद्देश आणि महत्त्व स्पष्ट करत पहिल्यांदाच डिजीटल जनगणना होत असल्याचे सांगितले. तसेच जनगणनेच्या पहिल्या टप्प्यात घरांची यादी आणि घरांची गणना माहिती संकलित केली जाणार असून, दुसऱ्या टप्प्यात प्रत्यक्ष लोकसंख्येची गणना करण्यात येणार आहे. जनगणनेचे हे काम अत्यंत महत्त्वाचे असुन, या तीन दिवसीय प्रशिक्षण शिबिरात दिलेल्या निर्देशाप्रमाणे सर्वांनी काम करावे. या तीन दिवसीय प्रशिक्षणात जनगणना संचालनालयाचे सहाय्यक संचालक अजय ठाकुर आणि विशाल दिवेकर हे प्रशिक्षणार्थींना जनगणना प्रक्रियेतील घरांची यादी दरम्यान घरोघरी जाऊन भेट देणे आदी मुद्यांबाबत सहभागी प्रशिक्षणार्थीना

प्रशिक्षण देवून सविस्तर मार्गदर्शन करणार आहेत. नगरपालिका व नगरपंचायतचे मुख्याधिकारी तसेच संबंधित अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले आहेत. प्रशिक्षण शिबिराच्या प्रारंभी




माहिती संकलनाची पद्धत तसेच डिजिटल माध्यमातून माहितीची नोंदणी, तसेच जनगणना-२०२७ च्या अनुषंगाने १ मे, २०२६ ते १५ मे, २०२६ या कालावधीत स्व-गणना ( ) आणि १६ मे, २०२६ ते १४ जून, २०२६ तसेच जनगणना कार्यातील विविध बाबी, माहिती संकलनाची प्रक्रिया तसेच क्षेत्रीय पातळीवरील अंमलबजावणीबाबत देखील सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. या प्रशिक्षणासाठी जिल्ह्यातील सर्व तहसीलदार, जिल्हाधिकारी कार्यालयाच्या इमारतीत सुरु करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय जनगणना कक्षाचे उद्घाटन अपर जिल्हाधिकारी तथा प्रभारी जिल्हाधिकारी रमेश मिसाळ यांच्या हस्ते करण्यात आले

# महिलांनी कार्यासह आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी - अधिष्ठाता डॉ.सईदा अफरोज

## जिल्हा स्त्री रुग्णालयात महिला दिन उत्साहात साजरा




**जालन । प्रतिनिधी -** जालना येथील जिल्हा स्त्री रुग्णालयात महिला दिनाचे औचित्य साधून महिला कर्मचारी, महिला डॉक्टरांचा उपजिल्हाधिकारी चाटे व अधीक्षक डॉ.एस.झेड. गवारे सह प्रमुख पाहुणे म्हणून शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ.सईदा अफरोज, सह विभागप्रमुख डॉ. वर्षा देशमुख, वर्ग १ स्त्री रोग तज्ञ डॉ. प्राची तारसेट्टीवर यांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला.

या कार्यकामासाठी कार्यालयाच्या वतीने बालरोग विभागप्रमुख डॉ. पियुष होलांनी, जेष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. संतोष राऊत,डॉ. अमोल लोंढे, स्त्री रोग तज्ञ डॉ. आश्विनी मिसाळ, डॉ. शीतल भगत,डॉ. प्रवीण ससाणे, डॉ.पाटील, डॉ. स्मिता गायकवाड,डॉ.स्वाती, डॉ. तौर,डॉ. पालवे, डॉ. घुले, सुरक्षाप्रमुख दीपाली खरात, खार्डे,मोहम्मद,रेणुका, औषध निर्माण अधिकारी राजेश्री पंडित,जानकर सिस्टरसह सर्व वैद्यकीय अधिकारी,आशिष भालटिलक,डॉ. रिना मेश्राम,मेट्रॉन व सर्व महिला कर्मचारी उपस्थित होते. सकाळी सर्व महिला कर्मचारी यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. उपजिल्हाधिकारी चाटे यांनी रुग्णालयातील विविध कक्षाची पाहणी केली व उपस्थित डॉक्टर, महिला सिस्टर यांच्याशी संवाद साधून त्यांच्या आडअडचणी समजावून घेतल्या.स्वच्छ सुंदर रुग्णालय पाहून उपजिल्हाधिकारी यांनी समाधान वेक्त केले. तसेच प्रसूती विषयक सेवा या अतिशय उत्तम देत असल्यामुळे रुग्णालय प्रशासक व सर्व रुग्णालयीन अधिकारी व आधिपरिचारिका, इन्चार्ज सिस्टर व कर्मचारी यांचे कौतुक केले. या महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात सुरुवातीला अधीक्षक डॉ. गवारे यांनी रुग्णालय, विविध सेवेबाबत सविस्तर माहिती दिली. डॉ.वर्षा देशमुख यांनी रुग्णालयामार्फत राबविण्यात आलेल्या नावीन्यपूर्ण उपक्रमाबाबत माहिती दिली. उत्कृष्ट कार्य करणाऱ्या डॉक्टर व महिला कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी सत्कारमूर्ती संगीता पाटोळे -आठवले यांनी मनोगत व्यक्त केले की, या कार्यक्रमामुळे आमचा कामाचा उत्साह वाढतो. अधिष्ठाता डॉ. सईदा अफरोज

यांनी महिलांना कार्यासह आपल्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी आवाहन केले. या कार्यक्रमाचे आयोजन केल्याबद्दल रुग्णालयातील मेट्रॉन रिटा खालँग्रीकर,विद्या पवार,सुनिता घोरपडे,बारगळ,पिंपोळे,सलिमा शेख, गडकरी, कुलकर्णीसह सर्व महिला कर्मचाऱ्यांन रुग्णालय प्रशासनाचे आभार मानले.

या कार्यक्रमाचे सूत्र संचालन शहानावाज अहमद,अविनाश जाधव यांनी केले तर आभार प्रदर्शन श्रीकांत करांजकडे यांनी मानले. कार्यालयीन अधीक्षक द्वारकास चव्हाण,विजया बर्डे, आशा देशमुख,आशा मोरे,मंगेश मोरे,अनिकेत जगताप,आकाश वानखेडे,आशिष जाधव व विशाल खांडेभराड, शुभम चव्हाण यांनी या कार्यक्रमाच्या यशस्वीसाठी प्रयत्न केले.

कामाची जबाबदारी देतात म्हणून कामाची ऊर्जा वाढते २०१३ पासून काम केले, परंतु कोणीही कामाची पावती दिली नाही. तुम्ही कामाची जबाबदारी देतात,मार्गदर्शन करतात म्हणून काम जास्तीत जास्त करण्याची इच्छा होते,इथून पुढे सुद्धा असेच काम करत राहणार, असल्याचे अधीक्षक डॉ.एस.झेड. गवारे यांना उद्देशून अधिपरिचारिका संगीता पाटोळे आठवले म्हणाल्या.

# कदीम जालना मैदानावर; महापौर वंदना मगरे यांच्याकडून पाहणी



**जालना । प्रतिनिधी -** शहरात रमजान ईदचा उत्साह आता शिगेला पोहोचला असून, ईदगाह कदीम जालना मैदानावर नमाज पठणासाठीची तयारी युद्धपातळीवर सुरू आहे. पवित्र ईद-उल-फित्रच्या निमित्ताने शहरात मोठ्या संख्येने मुस्लिम बांधव नमाजसाठी एकत्र येतात, त्या पार्श्वभूमीवर या मैदानाची स्वच्छता आणि इतर नियोजनाची कामे सध्या जोरात सुरू आहेत.

आज जालना महापालिकेच्या महापौर वंदना मगरे यांनी ईदगाह कदीम मैदानावर प्रत्यक्ष भेट देऊन सुरू असलेल्या कामांचा सविस्तर आढावा घेतला.

यावेळी ईदगाहचे मुतवल्ली शाह आलम खान यांच्या वतीने महापौरांचे जंगी स्वागत करण्यात आले.

सध्या मुतवल्ली शाह आलम खान यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण मैदानाची साफसफाई आणि सुशोभीकरणाची मोहीम राबवली जात आहे. नमाज पठणासाठी येणाऱ्या नागरिकांना कोणतीही अडचण भासू नये, यासाठी मैदानातील खड्डे बुजवणे, कचरा उचलणे आणि पाणीपुरवठ्याची सोय करणे याकडे विशेष लक्ष दिले जात आहे.

यावेळी बोलताना महापौर वंदना मगरे यांनी प्रशासनाला महत्त्वाच्या सूचना दिल्या. ''ईदच्या नमाज पठणासाठी जे काही आवश्यक साहित्य किंवा वस्तूंची गरज भासेल, ती महापालिकेच्या वतीने तातडीने पूर्ण केली जाईल,'' असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले. महापालिका प्रशासन आणि ईदगाह कमिटीच्या या समन्वयामुळे यंदाची ईद उत्साहात आणि सुरळीत पार पडेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.यावेळी स्वच्छता निरीक्षक अरुण वानखेडे समाजसेवक रणजीत मगरे यासह महानगरपालिकेचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते

# जालन्यात व्यावसायिक गॅस सिलेंडरचा तुटवडा, घरगुती सिलेंडरच्या काळ्या बाजाराला ऊत; ॲड. महेश धन्नावत यांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

शहरात आणि जिल्ह्यात व्यावसायिक गॅस सिलेंडरचा तीव्र तुटवडा निर्माण झाला असून, याचा थेट परिणाम हॉटेल आणि रेस्टॉरंट व्यवसायावर होत आहे. व्यावसायिक सिलेंडर उपलब्ध होत नसल्याने अनेक व्यावसायिक घरगुती गॅस सिलेंडर वापरत आहेत. यामुळे घरगुती सिलेंडरचा काळाबाजार वाढला असून सर्वसामान्यांची गैरसोय होत आहे, अशी गंभीर परिस्थिती ॲड. महेश धन्नावत यांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिली आहे. या संदर्भात त्यांनी जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांमार्फत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर केले आहे.ॲड. धन्नावत यांनी निवेदनात म्हटले आहे की, व्यावसायिक सिलेंडरच्या तुटवड्यामुळे हॉटेल आणि रेस्टॉरंट चालक घरगुती गॅस सिलेंडर मिळवण्यासाठी धडपडत आहेत. ही परिस्थिती घरगुती गॅसच्या काळ्या बाजाराला प्रोत्साहन देत असून, जाणीवपूर्वक हा तुटवडा निर्माण केला जात असल्याचा संशय त्यांनी व्यक्त केला आहे. घरगुती सिलेंडर व्यावसायिक वापरासाठी वळवले जात असल्याने, सामान्य नागरिकांना वेळेवर सिलेंडर मिळत नाहीत आणि त्यांना चढ्या दराने गॅस खरेदी करावा लागत आहे.जिल्हा पुरवठा कार्यालयाने शासकीय कॅन्टीन, दिवाणी रुग्णालय कॅन्टीन आणि न्यायालयीन कॅन्टीन यांना किती व्यावसायिक सिलेंडरची आवश्यकता आहे, याची आकडेवारी जाहीर करावी, अशी मागणी ॲड. धन्नवाट यांनी केली आहे.

तसेच, या आस्थापनांना पुरेशा प्रमाणात व्यावसायिक सिलेंडरचा पुरवठा सुनिश्चित करावा. जर पुरवठा करणे शक्य नसेल, तर त्यांना विशेष आदेशाद्वारे घरगुती सिलेंडर वापरण्याची परवानगी द्यावी, जेणेकरून त्यांच्या कामकाजावर परिणाम होणार नाही.पुरवठा विभागाने नुकत्याच केलेल्या कारवाईत अनेक हॉटेल्स आणि व्यावसायिक प्रतिष्ठानांवर छापे टाकून घरगुती सिलेंडर जप्त केले आहेत. मात्र, ही कारवाई केवळ तात्पुरती असून, मूळ समस्येवर तोडगा काढणे आवश्यक असल्याचे ॲड. धन्नावत यांचे म्हणणे आहे.जर प्रशासनाने तातडीने व्यावसायिक सिलेंडरचा पुरवठा सुरळीत केला नाही, तर सर्व हॉटेल्सना थेट घरगुती सिलेंडर वापरण्याची परवानगी द्यावी आणि त्याचा पुरवठा थेट करावा,

जेणेकरून काळाबाजार थांबेल, असा इशारा ॲड. धन्नावत यांनी दिला आहे. प्रशासनाने यावर तातडीने कार्यवाही न केल्यास, या गंभीर प्रश्नावर माननीय उच्च न्यायालयात दाद मागणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे. दरम्यान, जिल्हा प्रशासनाने जिल्ह्यात गॅसचा साठा मुबलक प्रमाणात उपलब्ध असल्याचे म्हटले असले

तरी, प्रत्यक्ष परिस्थिती वेगळी असल्याचे चित्र दिसत आहे. आंतरराष्ट्रीय घडामोडींमुळे एलपीजी पुरवठ्यावर परिणाम झाल्याचे सांगितले जात असले तरी, स्थानिक पातळीवर वितरण व्यवस्था सुधारण्याची गरज असल्याचे या निवेदनातून अधोरेखित होते.





जालना येथील पाणीवेस येथे नेहमीच वाहतूक ठप्प होत असून येथे दिवसभरासाठी वाहतूक पोलीस कर्मचारी असण्याची गरज आहे (छाया /जावेद तांबोळी)

# सात वर्षाच्या निमरा सिद्दिकी हिचा पहिला रोजा पुर्ण केला

**परतूर । प्रतिनिधी -** रमजान पवित्र महिन्यात मुस्लिम बांधव मोठ्या श्रद्धेने उपवास (रोजा) हा ठेवला जातो लहान,मोठे सर्वजन उपवास करतात परंतु लाहान मुलांनी उपवास केला तर त्याचे कवतूक होते.या दरम्यान परतूर येथील वॉल कम्पाऊंड सिमेंट प्रोडक्टस चे व्यापारी, मुन्नाभाई सिद्दिकी यांची सात वर्षाची मुलगी निमरा मुन्ना सिद्दिकी हिने आपल्या जीवनातील पहिला रोजा अत्यंत उत्साहात पुर्ण केला आहे.लहान वयात मोठी जिद्द या उन्हाळ्यात तापमान जास्त असते परंतु सात वर्षाची निमरा सिद्दिकी हिने सकाळी ते सायंकाळी इफतारपर्यंत



कडक उपवास पाळला लहान वयातच इस्लाम धर्मातील संस्कार व शिस्तीचे पालन करण्याची तिची ही जिद्द पाहून सर्वत्र तिचे कौतुक होत आहे. अल्हा च्या इबादतिसाठी तीने दाखवलेला हा सयंम वाखाण्याजोगा आहे. कुटुंबियिकडून शुभेच्छांचा वर्षाव निमरा सिद्दिकी तिचा पहिला रोजा यशस्वीपणे पूर्ण केल्याबद्दल वडील मुन्ना सिद्दिकी,आई,व कुटुंबातील सर्व सदस्यांनी तिचे विशेष कौतुक केले.इफतारच्या वेळी निमरा चे तोंड गोड करून तीला आशीर्वाद देण्यात आले.नातेवाईक, मित्रपरिवार व परिसरातील नागरिकांनी या चिमुकल्या मुलीवर शुभेच्छांचा वर्षाव केला.

### समता अभिनयाच्या माध्यमातून राज्यात महाड चौदार तळे समता संगराचा शताब्दी महोत्सव जोरात

# महाड क्रांतीचा इतिहास अभ्यासक्रमात समाविष्ट करण्याची समता अभिनयाची मागणी

**बोरघर । माणगांव -** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महाडच्या चौदार तळ्यावर दलितांसह पाणी प्राशन करण्यासाठी केलेल्या ऐतिहासिक सत्याग्रहाची तुलना फ्रेंच राज्यक्रांतीशी केली जाते. त्या समता संगराचा इतिहास विद्यालय आणि महाविद्यालयीन अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात यावा अशी मागणी पुढे आली आहे. येत्या शुक्रवारी २० मार्च पासून महाड क्रांतीचा शताब्दी महोत्सव राज्यात सुरू होत आहे. त्याचा प्रारंभिक समारंभ मुंबईच्या पत्रकार भवनात नुकताच पार पडला.

मुंबई मराठी पत्रकार संघ आणि समता अभियान यांनी संयुक्तरीत्या आयोजित केलेल्या त्या समारंभात ही मागणी पहिल्यांदा करण्यात आली. त्या मागणीला विचारपीठावरील नामवंतांनी आणि उपस्थित श्रोता समुदायाने टाळ्यांचा जोरदार कडकडाट करत पाठींबा व्यक्त केला. मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण यांच्या अध्यक्षतेखालील या समारंभात अभिनेते किरण माने, मुंबई विद्यापीठाच्या पत्रकारिता विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. सुंदर राजदीप, ज्येष्ठ पत्रकार दिवाकर शेजवळ, समान संधी अभियानचे अध्यक्ष सुनील कदम यांनी मार्गदर्शन केले.

सदर सभेत माजी खासदार हुसेन दलवाई, साहित्यिक अर्जुन डांगळे, शिक्षणतज्ज्ञ प्रा. डॉ. जी. के. डोंगरगावकर, प्रा. अविनाश कोल्हे, पँथर नेते सुरेश केदारे, मधू मोहिते, ॲड. संघराज रूपवते, पत्रकार जयवंत हिरे, मिलिंद सुर्वे, उत्तमराव गायकवाड, दिल्लीचे पत्रकार विरेन झा, सत्यशोधक सुनील सरदार आदी मान्यवर या समारंभाला उपस्थित होते.

महाड क्रांतीचा इतिहास अभ्यासक्रमात समाविष्ट करण्याच्या दृष्टीने त्याचे स्वरूप ठरवण्यासाठी नामवंत तज्ज्ञ प्राध्यापकांची एक समिती लवकरच स्थापन करण्यात येईल, अशी घोषणा सुनील कदम यांनी यावेळी केली. त्यांनी महाड क्रांती आणि फ्रेंच राज्यक्रांती यांच्यातील साम्य विस्ताराने सांगत चौदार तळ्यावरील लढ्याची ऐतिहासिकता विशद केली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महाडचे समता संगर आणि त्यानंतर गांधीजींनी केलेला दांडी सत्याग्रह हे जगाच्या इतिहासातील दोन मोठे प्रतिकात्मक आणि सनदशीर लढे गणले जातात, असे प्रतिपादन प्रा. डॉ. सुंदर राजदीप यांनी यावेळी केले.

अभिनेते किरण माने यांनी आपण महाड क्रांतीचा शताब्दी महोत्सव साजरा करत असतानाच देशात पुन्हा प्रति क्रांती होवू घातली आहे, असे सांगतानाच ती हाणून पाडण्यासाठी सिद्ध व्हावे, असे आवाहन आपल्या भाषणातून केले.

शैक्षणिक प्रगतीत जेमतेम असलेला इथला चैतन्य भंडारे हा एक दलित तरुण दोन यशस्वी कंपन्या थाटून जपानमध्ये मोठा उद्योजक बनतो, ही डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची क्रांती आहे, असे पत्रकार संघाचे अध्यक्ष




संदीप चव्हाण यांनी सांगितले. ही शताब्दी साजरी होत असतानाच आपल्या पुरोगामी महाराष्ट्रात आजही दलितांना पाण्यासाठी कसे लढावे लागते, हे सांगताना त्यांनी काही घटना उदाहरणादाखल सांगितल्या.

हल्लीचे खासगीकरण म्हणजे दलितांना पाणी नाकारण्यासाठी महाडचे तळे खासगी असल्याचा दावा करण्यामागील युक्तीचेच अनुकरण आहे, असे ज्येष्ठ पत्रकार दिवाकर शेजवळ यांनी आपल्या भाषणात सांगितले.

समता अभियानतर्फे महाड क्रांतीचा महोत्सव राज्यभरात साजरा करण्यासाठी गजानन शिरसाट, नामदेव साबळे, राजू रोटे, प्रमोद नाईक, संजय कांबळे. ॲड. जालिंदर यादव, सतीश डोंगरे, अशोक कांबळे यांनी पुढाकार घेतला आहे.

# ५०० रुपयांची लाच घेताना स्टॅम्प विक्रेता जाळ्यात

**जालना । गंगापूर -** शासकीय कामासाठी आवश्यक असलेल्या स्टॅम्प पेपरच्या किमतीपेक्षा ५०० रुपये अतिरिक्त लाचेची मागणी करून ती स्वीकारणाऱ्या एका अधिकृत स्टॅम्प विक्रेत्याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने () रंगेहात पकडले. श्रीकांत मोहनराव बनसोड (वय ७० वर्ष, रा. वर्धमान रेसिडेन्सी, गंगापूर) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. तक्रारदाराला शैक्षणिक कामासाठी स्टॅम्प पेपरची आवश्यकता होती. त्यांनी १३ मार्च रोजी बनसोड यांच्या दुकानातून काही स्टॅम्प पेपर खरेदी केले होते. त्यानंतर १६ मार्च रोजी तक्रारदार पुन्हा स्टॅम्प पेपर घेण्यासाठी गेले असता, ५०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरसाठी ५५० रुपयांची मागणी करण्यात आली. तसेच १० स्टॅम्प पेपरसाठी एकूण ५,५०० रुपयांची मागणी करून वरचे ५०० रुपये ही लाच असल्याचे आरोपीने स्पष्ट केले. तक्रारदाराची लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना येथे धाव घेऊन तक्रार नोंदवली. प्राप्त तक्रारीची शहानिशा केल्यानंतर, १६ मार्च रोजी गंगापूर येथील एस. एम. बनसोड या अधिकृत स्टॅम्प विक्रीच्या दुकानात सापळा रचण्यात आला. पंचांसमक्ष आरोपी श्रीकांत बनसोड यांनी तक्रारदाराकडून ५,५०० रुपये स्वीकारले. यात ५,००० रुपये स्टॅम्पची मूळ किंमत आणि ५०० रुपये लाचेची रक्कम होती. पैसे स्वीकारताच दबा धरून बसलेल्या एसीबीच्या पथकाने त्यांना ताब्यात घेतले. आरोपीच्या अंगझडतीमध्ये नोकिया कंपनीचा मोबाईल आणि रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे. आरोपी श्रीकांत बनसोड यांच्यावर गंगापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. ही कारवाई ला.प्र.वि. छत्रपती संभाजीनगरच्या पोलीस अधीक्षक श्रीमती माधुरी केदार कांगणे, अपर पोलीस अधीक्षक श्री. शशिकांत सिंगारे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शरदचंद्र रोडगे, सहाय्यक सापळा अधिकारी कोमल शिंदे आणि जालना एसीबीच्या पथकाने यशस्वीरित्या पार पाडली.

# जालना जिल्हा ग्रंथालय असोसिएशनच्या अध्यक्षपदी डी. बी. देशपांडे

**जालना । प्रतिनिधी -** जिल्हा ग्रंथालय असोसिएशनची वार्षिक सर्वसाधारण सभा ग्रंथ संग्रहालय श्रीराम वाचनालय बस स्थानका जवळ जालना येथे १५ मार्च -२०२६ रोजी झाली. जालना जिल्हा ग्रंथालय असोसिएशनच्या अध्यक्षपदी ग्रंथमित्र डी.बी.देशपांडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

प्रारंभी भारतीय ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ.एस.आर. रंगनाथान यांच्या प्रतिमेस मान्यवराच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन केल्या नंतर सभेची सुरवात झाली. सन २०२६ ते २०२९ या तीन वर्षासाठी नूतन कार्येकारी मंडळाची बिनविरोध निवड झाल्याची घोषणा निवडणूक अधिकारी अँड. राहूल चव्हाण यांनी केली. त्यानंतर कार्यकारी मंडळ पदाधिकारी याची सर्वानुमते निवड करण्यात आली. कार्येकारणी पुढील प्रमाणे- उपाध्यक्ष मुकुंदा खंदारे, कार्यवाह-श्रीकांत काळे ,सहकार्यवाह- काशिनाथ गायकवाड,कोषाध्यक्षप्रवीण देशपांडे,सदस्यपदी- डॉ. राजशेखर बालेकर,शाम शेलगावकर, मुरलीधर देशमुख,रावसाहेब अंभोरे,देवीदास जिगे,संदीप चव्हाण,संजय शिंदे,कांतराव डांगे,नंदकुमार कुलकर्णी,सुखदेव उघडे,संजय धारासूरकर,रत्नाकर नंद,शैलेन्द्र बदनापुरकर, कल्पना देशपांडे,नम्रता कुलकर्णी,संध्या देठे यांची निवड झाली. यासभेत मराठवाडा विभाग ग्रंथालय संघावर देवीदास देशपांडे,डॉ.राजशेखर बालेकर,शाम शेलगावकर,देविदास जिगे,आणि श्रीकांत काळे यांच्या यांची निवड करण्यात आली. राहुल चव्हाण मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, जिल्हा ग्रंथालय चळवळीमध्ये मला निवडणूक अधिकारी म्हणून ग्रंथालयाची सेवा करण्याची संधी मिळाली त्याबद्दल त्यांनी असोसिएशनचे आभार मानले. सामाजिक क्षेत्रात काम करीत असतांना चांगले-वाईट अनुभव येतात. समाजामध्ये कर्तव्य किंवा अधिकार सांगत असतांना आपल्यामध्ये कुठेतरी सेवाभाव असला पाहिजे आणि ती संधी मला श्रीराम वाचनालयाच्या माध्यमातून मिळत आहे. मनोगत व्यक्त करताना डी.बी.देशपांडे म्हणाले की, ग्रंथालय चळवळीमध्ये काम करीत असतांना मला आज पर्यंत ग्रंथालय चळवळीतील सर्व कार्यकत्यांनी खुप मदत केली त्यामुळेच मी ही चळवळ पुढे नेत आहे. ग्रंथालयांनी ग्रंथालय चालवितांना गावातील लोकांना सोबत घेऊन चालवावे. ग्रंथालय सुव्यवस्थित ठेवावे. ग्रंथालय ही वधिष्णू संस्था असल्यामुळे ग्रंथालयात येणाऱ्या ग्रंथाचे योग्य नियोजन करावे. जिल्हा ग्रंथालय असोसिएशन जिल्ह्यातील ग्रंथालयांना सदैव मार्गदर्शन करील अशी ग्वाही याप्रसंगी त्यांनी दिली. श्रीकांत काळे, देविदास जिगे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

# अल्पवयीन वाहनचालक; पालकांसाठी धर्मसंकट आणि कायद्याचा बडगा

आजकाल शाळा, शिकवणी वर्ग आणि सामाजिक जीवनात अल्पवयीन मुलामुलींकडून वेगाने वाहने चालवण्याचे प्रमाण धोकादायक पातळीवर पोहोचले आहे. मित्र-मैत्रिणींच्या प्रभावाखाली आणि आधुनिक जीवनशैलीच्या आकर्षणापोटी, अनेक मुले पालकांकडून वाहनांच्या चाव्या घेऊन रस्त्यावर उतरत आहेत. ही केवळ एक सामाजिक समस्या राहिलेली नाही, तर पालकांसाठी एक गंभीर कायदेशीर आणि भावनिक पेचप्रसंग बनली आहे. मुलांना शिस्त लावण्यासाठी रागावले किंवा मारले, तर बाल न्याय कायद्यांतर्गत तो गुन्हा ठरतो आणि जर त्यांना रोखले नाही, तर ते गंभीर गुन्हा करू शकतात, ज्यामुळे पालक कायद्याच्या कचाट्यात सापडतात.

पालकांची अवस्था महाभारतातील राजा धृतराष्ट्र आणि गांधारी यांच्यासारखी झाली आहे, ज्यांनी पुत्रप्रेमापोटी दुर्योधनाच्या चुकांकडे आणि हट्टाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले. या पुत्रमोहाचा अंतिम परिणाम केवळ दुर्योधनाचाच नव्हे, तर संपूर्ण साम्राज्याच्या विनाशात झाला. आजचे पालकही त्याच नैतिक द्विधेत अडकले आहेत. एका बाजूला मुलांचे प्रेम आणि त्यांच्या इच्छा पूर्ण करण्याची जबाबदारी, तर दुसऱ्या बाजूला कायद्याचे पालन करण्याची आणि समाजाच्या सुरक्षेची जबाबदारी आहे. मुलांच्या हट्टापायी त्यांना वाहन चालवू देणे हे धृतराष्ट्राप्रमाणेच त्यांच्या भविष्याकडे आणि समाजाच्या सुरक्षेकडे डोळेझाक करण्यासारखे आहे.

नुकतीच घडलेली एक घटना या समस्येची भीषणता डोळ्यासमोर आणते. एका अल्पवयीन मुलाने वेगाने गाडी चालवून एका महिलेला चिरडले, ज्यात तिचा दुर्दैवी मृत्यू झाला. या अपघाताने केवळ एका निष्पाप जीवाचा बळी घेतला नाही, तर त्या मुलाच्या कुटुंबाला अक्षरशः रस्त्यावर आणले. मोटार वाहन कायद्यानुसार, अल्पवयीन चालकाने अपघात केल्यास विमा कंपन्या नुकसान भरपाई देण्यास नसतात. परिणामी, न्यायालयाने मृत महिलेच्या कुटुंबाला दिलेली लाखो रुपयांची भरपाई देण्यासाठी त्या मुलाच्या कुटुंबाला आपली सर्व मालमत्ता आणि घर विकण्याची वेळ आली. या एका चुकीच्या निर्णयाने संपूर्ण कुटुंबाचे आयुष्य उद्ध्वस्त झाले.

मोटार वाहन (दुरुस्ती) कायदा, २०१९ नुसार, अल्पवयीन मुला-मुलींनी वाहन चालवून गुन्हा केल्यास, त्या वाहनाचा मालक किंवा पालकांना जबाबदार धरले जाते. या कायद्यातील तरतुदी अत्यंत कठोर आहेत. यामध्ये पालकांना तीन वर्षांपर्यंत तुरुंगवास आणि पंचवीस हजार रुपयांपर्यंत दंडाची शिक्षा होऊ शकते. इतकेच नाही, तर त्या वाहनाची नोंदणी एका वर्षासाठी रद्द केली जाऊ शकते आणि गुन्हा करणाऱ्या अल्पवयीन व्यक्तीला वयाची पंचवीस वर्षे पूर्ण होईपर्यंत वाहन चालवण्याचा परवाना दिला जात नाही.

सर्वोच्च न्यायालयाने नुकत्याच गाजलेल्या पुणे पोर्शे अपघात प्रकरणात महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवले आहे. न्यायालयाने म्हटले आहे की, ''मुलांच्या हातात महागड्या गाड्या आणि अमाप पैसा देणारे पालकच मद्यधुंद अवस्थेत होणाऱ्या अपघातांना खऱ्या अर्थाने जबाबदार आहेत.'' न्यायमूर्तींनी पालकांच्या भूमिकेवर तीव्र ताशेरे ओढत म्हटले की, ''नशा करून भरधाव वेगाने गाडी चालवणे आणि रस्त्यावरील निष्पाप लोकांना चिरडणे याला सेलिब्रेशन म्हणता येणार नाही.'' हे निरीक्षण पालकांच्या जबाबदारीचे गांभीर्य अधोरेखित करते.

अनेक न्यायालयीन निवाड्यांमध्ये हीच भूमिका स्पष्ट करण्यात आली आहे. कर्नाटक उच्च न्यायालयाने एका निकालात स्पष्ट केले आहे की, अल्पवयीन मुलाने अपघात केल्यास नुकसान भरपाई देण्यास वाहन मालक जबाबदार आहे, विमा कंपनी नाही. न्यायालयाने म्हटले आहे की, अल्पवयीन मुलाकडे कायदेशीररित्या परवाना असूच शकत नाही, त्यामुळे विमा कंपनीला ''आधी पैसे द्या आणि नंतर वसूल करा'' असे निर्देशही देता येणार नाहीत. मध्य प्रदेश उच्च न्यायालयाने देखील असेच मत व्यक्त केले आहे की, अल्पवयीन मुलाला वाहन चालवू देणे हे विमा पॉलिसीच्या अटींचे थेट उल्लंघन आहे.

या कायदेशीर तरतुदींमुळे पालक दुहेरी संकटात सापडले आहेत. एकीकडे मोटार वाहन कायदा त्यांना जबाबदार धरतो, तर दुसरीकडे बाल न्याय (मुलांची काळजी आणि संरक्षण) अधिनियम, २०१५ नुसार, मुलांना शारीरिक किंवा मानसिक त्रास देणे हा देखील गुन्हा आहे. मुलांना वाहन चालवण्यापासून रोखण्यासाठी कठोर पावले उचलल्यास ते कायद्याचे उल्लंघन ठरते आणि त्यांना मोकळीक दिल्यास अपघाताचा धोका आणि कायदेशीर कारवाईची टांगती तलवार असते.

ही समस्या केवळ कायद्याने सुटणारी नाही. यासाठी शाळा, महाविद्यालये, शिकवणी वर्ग आणि सामाजिक संस्थांनी पुढाकार घेऊन ''एकही अल्पवयीन विद्यार्थी वाहन चालवणार नाही'' यासारखे उपक्रम राबवून विद्यार्थ्यांमध्ये वाहतुकीच्या नियमांविषयी आणि धोक्यांविषयी जनजागृती करणे अत्यंत आवश्यक आहे. या संस्थांनी मुलांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देऊन त्यांना सायकल किंवा सार्वजनिक वाहतुकीसारखे सुरक्षित पर्याय वापरण्यास प्रोत्साहित केले पाहिजे.

विद्यमान कायदेशीर चौकट पालकांना अडचणीत आणणारी आहे. एका बाजूला मुलांचे संरक्षण करणारे कायदे आहेत, तर दुसऱ्या बाजूला त्यांच्या चुकांसाठी पालकांना कठोर शिक्षा ठोठावणारे कायदे आहेत. या विरोधाभासामुळे पालक हतबल झाले आहेत. निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींनी या गंभीर समस्येवर विचार करून कायद्यात सुसंगत सुधारणा करणे आवश्यक आहे, जेणेकरून पालकांना अपराधी न ठरवता समस्येच्या मुळाशी पोहोचता येईल.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे, विमा कायद्यांमध्ये बदल करून अशा अपघातांमध्ये पीडितांना विमा संरक्षण मिळेल, याची खात्री करणे गरजेचे आहे. जेणेकरून अल्पवयीन मुलाच्या चुकीमुळे पालकांना त्यांची आयुष्यभराची कमाई आणि मालमत्ता गमावावी लागणार नाही. कायद्याचा उद्देश गुन्हेगाराला शिक्षा देणे आणि पीडिताला न्याय देणे असावा, संपूर्ण कुटुंबाला रस्त्यावर आणणे नाही.

अल्पवयीन मुलांनी वाहन चालवणे ही एक गंभीर सामाजिक आणि कायदेशीर समस्या आहे, जी अनेक कुटुंबांच्या विनाशास कारणीभूत ठरत आहे. यावर नियंत्रण मिळवण्यासाठी पालक, शिक्षण संस्था, सामाजिक मंडळे आणि सरकार या सर्वांनी एकत्रितपणे जबाबदारीने प्रयत्न करणे काळाची गरज आहे.

कायद्याची कठोरता, सामाजिक जनजागृती आणि कायद्यातील आवश्यक सुधारणा यांचा समन्वय साधूनच या गंभीर समस्येवर प्रभावी तोडगा काढता येईल. अन्यथा, आजचे पालक हे महाभारतातील धृतराष्ट्राप्रमाणेच आपल्या मुलांच्या चुकांचे मूक साक्षीदार बनून राहतील आणि त्याचे गंभीर परिणाम संपूर्ण समाजाला भोगावे लागतील.

**- ॲड. महेश एस. धनावत**

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.